# मंतरलेल्या कविता
# आणि
# अनामिक विरांगना

पहिली आवृत्ती

संकलक
चंद्रकांत शहासने
(देशभक्तकोशकार)
मो.क्र. - ९८८१३७३५८५

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या सौजन्याने

ही पुस्तिका कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या राष्ट्रभक्ती पर्यावरण आणि आरोग्य साक्षरता अभियानअंतर्गत प्रकाशित केली.

पुस्तकाचे नाव : मंतरलेल्या कविता आणि अनामिक विरांगना
संकलक : चंद्रकांत शहासने (देशभक्तकोशकार) पुणे
मो.क्र. - ९८८१३ ७३५८५
प्रकाशक : बहुजन साहित्यधारा, पुणे
११ ए, राहुल कॉम्प्लेक्स,
चौथा मजला, पौड रोड, पुणे.
दुरध्वनी : ९८८१३७३५८५
हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.
प्रकाशन दिनांक : २५ डिसेंबर २०२२ पहिली आवृत्ती
मुद्रक : श्री वेंकटेश पब्लिकेशन, पुणे
हिंगणे खुर्द, सिंहगड रोड. मो. क्र. ८२३७८ ९३३४७
पुस्तकाचे हक्क : ॲड. नंदिनी शहासने

ही पुस्तिका कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या राष्ट्रभक्ती पर्यावरण आणि आरोग्य साक्षरता अभियानअंतर्गत प्रकाशित केली.

मूल्य : रूपये ४०/-
संपर्क : श्री. हेमंत प्रभाकर आळवे, ठाणे
मो. : ९३२२२६९७२१
श्री. अशोक जनार्दन फडणीस, मेणोली-वाई
९८५०५ ०९४१६
श्री. भानुदास सोपान पायगुडे, धनकवडी-पुणे
९८५०३५१०३५

Or Pay to VPA

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे या संस्थेस दिलेल्या देणग्या आयकर माफीस प्राप्त आहेत.
No.: THN/C.I.T.II/Tech/80G/104/2010-11/1479 Dt: 21/09/2010

## स्वातंत्र्य संग्रामातील विरांगनांचे योगदान

## दर्शविणारे पथनाट्य

# अनामिक विरांगना

## सूत्रधार

इ.स. १९५७ सालच्या समरापूर्वी भारताच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत सर्व देशांतील लोक हीन, दीन, गलीतधैर्य, अस्मानी सुलतानीने त्रस्त, कावलेले, दुबळे झाले होते. देवाच्या कोपामुळेच की काय दुष्काळी वारंवार पडत होते. लोक अन्नावाचून तडफडत होते. त्यात विस्तारवादी घोरणामुळे सत्त गमावलेले सत्ताधीश, जहागीरदार, जमिनदार यांच्यात इंग्रजी सत्तेविरुद्ध असंतोष वाढीस लागला. सामान्य जनता, सैनिक आणि सत्ताधारी या सर्वांनी मिळून स्वातंत्र्ययुद्ध पुकारले. २९ मार्च १८५७ रोजी मंगल पांडेने काडतुसांच्या निषेधार्थ आपल्या वरिष्ठ इंग्रज अधिकाऱ्यावर गोळी झाडली आणि त्या दिवसांपासून या संघर्षाचा वणवा सर्व भारतभर पसरला. त्यात असंख्य ज्ञात आणि अज्ञात व्यक्तींनी आत्मसमर्पण केले तर काही हसतमुखाने बलिवेदीवर चढले. या सर्वामध्ये झाशीच्या राणीप्रमाणे आणखी काही आदिवासी राण्यांनीही अन्यायाच्या प्रतिशोधाकरीता रणचंडीचे रूप धारण केले आणि आत्मसमर्पण केले. परंतु त्यांची नावे मात्र सामान्य लोकांना ज्ञात नाहीत. अशा स्त्रियांच्या समर्पणाचा हा जीवनपट आम्ही आपल्यासमोर मांडत आहोत. या वीरांगनांनी घडविलेला पराक्रमाचा इतिहास आपण स्मरणांत निश्चितच ठेवाल.

**इथे म्लेंच्छ सत्ता धुमाकुळ घाली**
**कुणी नाही त्राता प्रजाप्रस्त झाली ।।**

**प्राणीमात्र जाले दुःखी,**
**पाहता कोण्ही नाही सुखी**
**कण्णि काळे वोळखी, धरीनात कोण्ही।।**
**लोक बहुत प्रस्तावले,**
**किती येक जाचावले**
**किती येक ते कावले उद्वेगरुपी ।।**



## तुळसापुरची राणी

***"कधी नाही देणार झाशी तुम्हाला***
***असे गर्जुनी सांगते इंग्रजाला***
***रणी घेतली क्रांतीची अग्निज्वाला***
***नमस्कार त्या झाशीच्या लक्ष्मीला"***

खरोखरच झाशीच्या राणीचे आम्हावर उदंड उपकार आहेत कि जिने आम्हाला इंग्रजाविरुद्ध लढण्याचे बळ दिले. अरे, आम्हाला अबला का म्हणता? अवला नव्हे आम्ही सवला आहोत, हो, हो सबलाच आहोत.

तुळसापूर हे लखनौमधील छोटेसे संस्थान, माझ्या पतीला इंग्रजांनी अटक केली आणि त्यातन त्यांचा देहान्त झाला. माझ्यावर जणू काही दुर्दैवानी कुन्हाडच कोसळली. पण मी धीर सोडला नाही. इंग्रजांची आमच्या जहागिरीवर वक्रदृष्टी होती. ही एक विधवा अबला, आपला काय मुकावला करणार असे त्यांना वाटले, आणि म्हणूनच मी बाळासाहेब पेशव्यांना माझ्या किल्ल्यात आश्रय दिला. पेशव्यांना आश्रय देण्याचे परिणाम काय होतील हे मी जाणूनच होते. तरी सुद्धा स्वातंत्र्य लढ्याबद्दलच्या प्रेमापोटीच संकटाची जाणीव असूनही मी हे धाडस केले. नाही तर माझी आता टेह आणि संपत्ती यांची आसक्ती नष्ट झाली होती. अहो! बाळासाहेबांचे प्राण वानले तर ते जातीनी पुन्हा प्रज्वलित

करतीलच ना?

बाळासाहेबांना मी आश्रय दिल्याचे वृत्त इंग्रजांच्या कानी गेले आणि त्यांना पकडण्यासाठी इंग्रज सेनानी सर ग्रेट टोप आपल्या सैन्यासहीत तुळसापूरवर चाल करुन आला. त्याला वाटले ही बाईमाणूस आपल्याला कसला विरोध करते? पण, खरं सांगू, त्याचे ते सैन्य पाहून माझ्यांत जणू काही रणचंडीकाच अवतरली, माझे मनोधैर्य खचेल, असे त्यास वाटले परंतु त्याचा अंदाज चुकला. मी माझ्या सैन्यासह सतत सात दिवस आमचा किल्ला लढवला. अगदी घनघोर लढाई केली. इंग्रजांना सात दिवस लढाईत गुंतवून त्यांचा बाळासाहेबांना अटक करण्याच्या डाव मी उधळून लावला. पेशवे या सात दिवसांत किल्ल्यातून कधीच निघून गेले होते. मी आणि माझ्या प्रजेने ही स्वातंत्र्याची ज्योत सर्वस्वाचा होम करुन तेवत ठेवली. म्हणूनच म्हणते,

*''हे वंदनीय भारत,*
*अभिनंदनीय भारत,*
*तेरी जनम जनमभर,*
*हम अर्चना करेंगे*
*हम वंदना करेंगे''*

**रामगडची गोंड राणी**

*पडो वज्र वा पीडा डोईवरी*
*बुडो पृथ्वी सारी समुद्रांतरी*
*अये राष्ट्रपाते यशोदामिनी*
*करु प्राणत्यागास सत्कारणी ।।*

मध्य प्रदेशातील मांडला जिल्ह्यातील गोड लोकांचं आमचं रामगड

संस्थान, पतीच्या निधनानंतर मी माझ्या औरस पुत्राला गादीवर बसवलं आणि या छोटयाशा राज्याचे स्वातंत्र्य घोषित केले. पण हा फिरंगी डलहौसी याने माझं राज्य खालसा केले आणि राज्याचा देखभालीचा कारभार एका इंग्रज अधिकाऱ्याकडे सोपविला.

अर्थातच मी माझे राज्य खालसा केले याचे कारण मला सांगा, असा खलिता डलहौसीला पाठवला. पण त्याचे उत्तर आले नाही. वारंवार पत्र लिहून, सर्व सनदशीर मार्गाचा अवलंब करून पाहिला, पण व्यर्थ.

आता मात्र माझी तळपायाची आग मस्तकाला भिडली. त्या इंग्रज अधिकाऱ्याने माझा औरस पुत्र वेडा आहे. म्हणून माझे राज्य खालसा केले असे कळविले. माझ्या औरस पुत्राला वेडा ठरविण्याचा यांना काय अधिकार? माझे राज्य खालसा करणारे हे कोण?

प्रथम मी त्या इंग्रज अधिकाऱ्यांची माझ्या  राज्यातून हकालपट्टी केली आणि सर्व कारभार माझ्या हातात घेतला. पुढे ठाकूर आणि जमिनदार मंडळींशी संधान बांधून माझे सैन्य उभे केले आणि ब्रिटीश सत्तेविरुद्ध लढा पुकारला. २७ ऑगस्ट १८५७ रोजी जबलपुरच्या कमिशनरने मला शरण येण्यास सांगितलं. निराधार विधवा, मी काय लढणार, हा त्याचा समज साफ खोटा ठरला. १ एप्रिल १९५८ रोजी या ब्रिटीश अधिकाऱ्याने माझ्या राज्यावर हल्ला चढवलाच. सतत आठ महिने मी आणि माझे झुंजार सैनिक गनिमी काव्याने लढत होते. इंग्रजांना अगदी सळो का पळो करून सोडले होते. त्यांना युद्ध नको असेही वाटू लागले होते. परंतु हाय! दुर्दैव आड आले आणि आमचा पराभव झाला. जनरल नीलने शेकडो स्त्रिया, तरुणी, माता व मुलींना जिवंत जाळले. मोजदादही ठेवली नाही. इंग्रज शिपाई मला पकडण्यासाठी येण्यापूर्वीच भी माझ्याच तलवारीने माझा अंत करवून घेतला. पण मला खात्री आहे. की आमने झुंजार सैनिक आज ना उद्या आपल्या देशाला स्वतंत्र करतीलग म्हणून म्हणते.

*हे मातृभूमी प्रिय पावन, पुण्यभूमी*
*हे आर्यभूमी तुज वंदन धर्मभूमी ।।*
*सर्वस्व अर्पण असो तुझियाच कामी*
*व्हावे कृतार्थ करुनी तुज धन्य आम्ही ।।*

## आदिवासी राणी लक्ष्मीबाई

*देशरक्षा परं पुण्यं देश रक्षा परं वृतम्।*
*देशरक्षा परो त्यागः देश सेवारतो भवेत्।।*

झाशीच्या राणीचे नाव लक्ष्मीबाई आणि माझेही नाव लक्ष्मीबाई. तेव्हा झाशीच्या राणीच्या नावलौकीक मलाही पुढे चालवायलाच हवा ना? आमचं मध्यप्रदेशातील बांदा नावाचे एक छोटेसे अहिरी लोकांचे संस्थान, उत्तर भारतात स्वाय लढा पेटल्याचे कळताच मीपण गोंड, मरिये, रोहिले यांना एकत्र करून त्यांच्या फौजा उभ्या केल्या. माझ्याबरोबर बाबूराव आणि वेंकटराव हे दोन जमिनदारही होतेच. हे दोन्ही बंडखोर गनिमी काव्याने इंग्रजांशी लढत होते. त्यांचा मुकाबला करणे इंग्रजांना शक्य नव्हते तेव्हा फिरंग्यांनी ङ्कङ्क्या बंडखोरांना आमच्या ताब्यात द्याङ्कङ्क असा मला खलिता पाठवून माझ्यावर दडपण आणण्याचा प्रयत्न केला आणि जर त्यात फिरंग्यांना मदत केली नाही तर खटला भरण्यात येईल व माझे राज्यही खालसा करण्यात येईल अशी धमकीही दिली. परंतु स्वदेशाभिमान आणि स्वातंत्र्य या विचारांनी मी पूर्णपणे भारावून गेले होते. अहो

जो स्वदेशाचे रक्षण करत नाही तो खरा माणूसच नव्हे, त्याचे जगणे हे खरे जगणेच नव्हे. ते जगणे मृत्यूसमान मानले पाहिजे. कारण जननी जन्मभूमी! स्वर्गादपि महान्, मग मी या महान जन्मभूमीला काळीमा लावू? नाही ते कदापि शक्य होणार नाही? मनाचा निश्चय केला आणि या दोन्ही बंडखोरांना भूमिगत

केले. त्यांना दडवून ठेवले. परंतु काय दुर्दैव! आम्हा भारतीयांना नाहीतरी फंदफितुरीचा शाप आहेच. त्यांची लपण्याची जागा एका नमकहराम माणसाने दाखविली आणि त्या दोघांनाही इंग्रज सरकारने पकडून फासावर दिले. त्यांचा स्वातंत्र्य संग्राम मी पुढे चालू ठेवलाच पण जो इतर बंडखोरांचा शेवट झाला तोच माझाही झाला. म्हणूनच म्हणते हे देवा! पुनर्जन्म असेलच तर तू मला परत या भारतभूमीतच जन्म दे कि जिचे पांग फेडण्यासाठी मला संधी मिळू दे.

***देशार्थ धर्मार्थ काया झिजावी***
***वसो अंतरी पूर्ण देशाभिमान,***
***सीता सती पद्मीनी वीरलक्ष्मी***
***तसे प्राप्त होवो आम्हा जीवन.***

तिन्ही विरंगना एकत्र येतात आणि खालील स्वतंत्रतेची प्रार्थना म्हणतात.

**जयोस्तुते ते श्री महन्मंगले । शिवास्पदे शुभदे।**
**स्वतंत्रते भगवती । त्वामहं यशोयुतां वंदे ।।धृ।।**
**राष्ट्राचे चैतन्य मूर्त तूं निती संपदाची**
**स्वतंत्रते भगवती । श्रीमती राज्ञी तू त्यांची**
**परवशतेच्या नभांत तूं ची आकाशी होशी**
**स्वतंत्रते भगवती । चांदणी चमचम लखलखशी ।।**
**मोक्ष मुक्ति ही तुझीच रूपें तुलाच वेदान्ती**
**स्वतंत्रते भगवती । योगीजन परब्रह्म वदती**
**जे जे उत्तम, उदात्त उन्नत महन्मधुर**
**ते ते स्वतंत्रते भगवती । सर्वतव सहचारी होते।**
**हे अधम रक्त-रंजिते सुजन-पूजिते श्री स्वतंत्रते**
**तुजसाठी मरण ते जनन**
**तुजवीण जनन ते मरण**

**तुज सकल चराचर शरण**
**श्री स्वतंत्रते, श्री स्वतंत्रते, श्री स्वतंत्रते**
**सूत्रधार**

अशा असंख्य वीर विरांगनांनी देशासाठी प्राणार्पण केले आणि सरते शेवटी तो महन्मंगल असा स्वातंत्र्याचा दिवस उजाडलाच. १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपण स्वतंत्र झालो. १५ ऑगस्ट १९४७ च्या सूर्योदयाबरोबरच पारतंत्र्याचा अंधार संपला. कोट्यावधी भारतीयांचे स्वप्न अखेर साकार झाले आणि ग. दि. माडगुळकरांच्या हर्षोत्सहित प्रतिभेने ललकारी दिली.

**हिमालयावर झडली नौबत ।**
**स्वतंत्र झाला राजा भारत।**
**इतिहासांच्या दिल्ली शहरी ।**
**अभिषेकाची होत तयारी ।**
**मयुर सिंहासनी हासरी ।**

**चढली मूर्ती डोलडोलत ।**
**हा तर राजा स्वतंत्र भारत ।।**
**चौदा भाषा गर्जत उठल्या ।**
**जय मृत्युंजय जय हिमपर्वत ।**
**जय रणचंडीके जय जय भारत।**
**जय भारत जयहिंद ।**

**सौ. विशाखा ना. दांडेकर**

**त्रैमासिक कर्नाळा क्रांतिपुष्प अकरावे मधील प्रकाशित लेख साभार.**

# भारतीय स्वातंत्र्य समरातील मंतरलेल्या कविता

पारतंत्र्य झुगारून देण्यासाठी भारताने परकीय साम्राज्य ब्रिटीश सत्तेशी एक प्रदीर्घ झुंज दिली व लढाही केला व या लढ्यांत अनेक स्वातंत्र्य- वीरांनी, देशभक्तांनी व नागरिकांनी स्वार्थत्यागपूर्वक, हालअपेष्टा सोसून, देहदंड भोगून, प्रसंगी प्राणांची आहूती देऊनही भाग घेतला. नानापरिंनी स्वातंत्र्य- यज्ञांत आपला हाविर्भाग अर्पण केला. त्यांत प्रतिभावान लेखक, कवीही होते. भारतांतल्या हिन्दी, उर्दू, कानडी, तेलगु कवींनी स्वातंत्र्य गीते, समर गीते, संग्राम गीते रचून स्वातंत्र्य वीरांना उत्साहीत केले, स्वातंत्र्य लढ्याला ओजस्वी रूप दिले. मराठी भाषेतही सेनापती बापट, सानेगुरुजी, स्वातंत्र्यवीर सावरकर, यशवंत, कवी गोविंद, कुसुमाग्रज, वसंत बापट, ग. दि. माडगुळकर, अमर शेख आदींनी उर्जस्वल अशी स्वातंत्र्य गीते लिहून आपले योगदान दिलेले आहे.

राष्ट्रभावना किंवा समाजमन जागृत असणाऱ्या प्रतिभावंतासमोर त्याकाळी स्वातंत्र्य लढ्याच्या रुपाने राष्ट्रीय आव्हानच उभे ठाकलेले होते. ते दिवसच तसे संवेदनशील मनाला भारुन टाकणारे होते. त्या मंतरलेल्या दिवसांतच 'मंतरलेली गाणी' जन्माला आली. कवीच्या प्रतिभा जागृत झाल्या. शाहिरांना कंठ फुटले आणि ते म्हणू लागले,

*"देशार्थ जगेन ! देशार्थ मरेन !*
*देशार्थ ! सर्व दान !"*

पोवाडे, गाणी, लावण्या, प्रातः स्मरण, संग्रामगीते, स्वातंत्र्य गीते, समर गीते कितीतरी स्फूर्ती- कवने त्या काळात लिहिली गेली. त्या मंतरलेल्या गीतांचा हा धावता आढावा.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात श्री समर्थ रामदास स्वामींनी हाक दिली.

*धर्माकरिता मरावे । मरोनी अवघ्यासी मारावे ।*
*मारिता मारितां घ्यावे राज्य आपुले ।।*

या हा केसरशी, छत्रपतींनी स्वराज्य निर्माण केले. १७५७ साली बंगालमध्ये प्लासीच्या लढाईत भारतीय हरले आणि पारतंत्र्याला सुरुवात झाली. १८५७ साली स्वातंत्र्याचा लढा सुरु करुन, देश स्वतंत्र करण्याचे ठरविले. नानासाहेब पेशवे, झाशीची , राणी लक्ष्मीबाई, सेनापती तात्या टोपे, कुंवरसिंग, अहमद शहा आणि दिल्लीचा बादशहा बहादूर शहा यांनी फौजेसह इंग्रजी सत्ता उलथून टाकण्यासाठी उठाव केला. त्यावेळी त्याला अपयश आले. बादशहा बहादूर शहांनी पहिली घोषणा केली ती काव्यांत.

*''गाझीयोमे बू रहेगी। जब तलक इमानकी।*
*तब तो लंडन तक चलेगी । तेग हिन्दुस्थानकी ।।*

येथील उठाव, ब्रिटीश सत्तेने क्रुरतेने दडपले. राणी लक्ष्मीबाईचे बलिदान झाले. कवीच्या मुखांतून गौरवोद्गार बाहेर पडले -

*रे हिंदबांधवा थांब या स्थळी अश्रु दोन ढाळी।*
*ती पराक्रमाची ज्योत मावळे इथे झाशीवाली।*

सन १८७९ साली आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांनी ब्रिटीशांविरुद्ध लढा पुकारला. त्यांत अपयश आले, एडनच्या तुरुंगात त्यांचा मृत्यू झाला. कवी कुसुमाग्रज म्हणू लागले, -

*''वीरा, अमित तुझा महिमा ।''*
*अगाध किमया तुझिया हाती ।*
*फुलवीसी पाषाणांतून ज्योती।*
*रजःकरणांवर ये स्पर्शेती।*
*रत्नांचीच कमान।*
*वीरा, अमित तुझा महिमा।*

कवी केशवसुतांचा काळ पारतंत्र्याचा, देशाला प्राप्त झालेले दास्य, त्याच्या वेदना, समाजाची तळमळ, कवी केशवसूत व्यक्त करतात –

*''आहे आम्हावर जवनिशा पारतंत्र्यांधकारे।*
*वाहे जीवा उत्तर कुदशेचे तरी फारवारे।*
*केव्हा अशी सुटनी सहसा पंचरातूनि देवा ।*
*राष्ट्रत्वाला फिरुनी आमचा देश येईल केव्हा।।''*

स्वातंत्र्य लढयाच्या इतिहासांत अजरामर ठरणारा व इंग्रज सरकारचा काळ ठरणारा २१ जून १८९७ चा दिवस. पुण्याचा चतुशृंगीचे मंदिरांत क्रांतिवीर चाफेकरांनी आपल्या उत्स्फूर्त काव्यांतून अंबे जगदंबेला साकडे घातले.

*''आई अंबे जगदंबे जातो सत्कर्मी जय दे*
*रिपू–दमनाचा आई भवानी आम्हाला जय दे।*
*आम्हा नाही तुजवाचूनी कोणी जगी आसरा ।*
*पुण्यपतनी धर्म बुडविला । रॅण्डनी सारा ।।*
*त्या माराया अविचार। हाती आमुच्या ।।*
*जय अंबे धैर्य शौर्य मग दे आई।*
*आई अंबे जगदेवे जातो आम्ही जय दे ।।धृ।।''*

क्रांतिवीर चाफेकर बंधुनी रॅण्डचा वध केल्यानंतर चाफेकरांचे गुणकिर्तन करतांना सावरकर म्हणतात,

*''पराक्रमाच्या तेजा तुमच्या त्रासुनि*
*निंदिती जरी घुबडे*
*वीर कथा तुमची ही गाईल पिढी पिढी*
*नव पुढे पुढे ।।'*

चाफेकरांच्या बलिदानाने एक नवं अलौकिक पर्व सुरु झाले. नाशिकमधल्या भगूर खेड्यांतल्या पाच तरुणांचे मन पेटून उठले आणि त्याने म्हटले

*कार्य सोडूनी अपुरे पडला झुंजत, खेती नको पुढे।*
*कार्य चालवू गिरवीत तुमच्या पराक्रमाचे आम्ही घडे ।।*

१८८० नंतर सतत ब्रिटीश सत्तेविरुद्ध लढे होतच राहिले. त्यांत अनेक क्रांतिकारकांनी भाग घेतला. त्यांत राजा महिंद्र प्रताप, स्वातंत्र्यवीर सावरकर श्यामजी कृष्णा वर्मा, भगतसिंग, राजगुरु, सेनापती बापट यांचे विस्मरण होणार नाही.

कवी विनायक दामोदर सावरकर म्हणजे महाराष्ट्र शारदेच्या कंठातील एक तेजस्वी त्यांनी स्वतः क्रांतिकाव्यंत काव्यसागर निर्माण केला. सावकारांबद्दलचे एका कवीचे हे उद्गार –

*राजमुकुट राज चिन्हही नाही सिंहासन ।*
*अनभिषिक्त या सम्राटाचे अढळ तरी आसन ।*
*रणवीण स्वातंत्र्य कोणा मिळेना ।।धृ।।*
*असा भूतकालिन सिद्धांत जाणा ।*
*स्वराज्येने पाहिजे बुद्ध केले*
*(केले रणवीण स्वातंत्र्य कोणा मिळाले ।।*

अशा विचारांच्या या क्रांतिवीराने सावरकरांनी आपल्या काव्यातूनच तरुणांना आव्हान केले.

*निज जाती छळाने, हमको न सळसळते।*
*तुम्ही तरुण शिरांतुनि रक्त नते सळसळते।*

*हे नये रक्त तो विजेहून पेटावे।।*
*मृत्यूस तुम्ही गाठून बळे भेटावे ।।*

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सागरा प्राण तळमळला हे काव्य लिहून मातृभूमीची ओढ व्यक्त केली.

*तुजसाठी मरण ते जनन । तुजवीण जनन ते मरण ।।*
*तूज सकल चरचर शरण ।*
*हे स्वतंत्रते भागवते ।।धृ।।*

सावरकरांची ही स्वातंत्र्य गीते धगधगते अस्त्र होते. त्यांनी ''मंतरलेली तरुण मने'' तयार केली.

संपूर्ण भारतात मलाल-बाल-पाल या चैतन्य निर्माण केले. १९२० साली गांधी युग सुरु झाले.

१९१५ साली आफ्रिकेतून परत आलेल्या 'गांधीनी असहकार आंदोलन सुरू केले. चरखा चलाचला के लेंगे. स्वराज्य लेंगे असा घोष त्यांनी सुरु केला. जंगल सत्याग्रह, असहकार, मीठ सत्याग्रहाने भारतांत परत चैतन्य निर्माण झाले

ब्रिटीश साम्राज्यवादी सूर्य कधीच मावळत नाही. अशी दर्पोक्ती ब्रिटीश साम्राज्यवादी व त्यांचे बगलबच्चे उच्चारीत असत. गांधीनी त्यांना आव्हान दिले. त्यावर स्वातंत्र्याची ज्योत अत्यंत तेवत असणारा हा कवी उत्कटतेने उत्तरतो,

*दास्यवृत्तीने बुरसटलेल्या म्हणोत कोणी मृतवाचा ।*
*अखंड तळपे सूर्यविव या साम्राज्यावर आंग्लांच्या।*
*''सुर्यावाचूनी नांदू आम्ही'' म्हणती ।*
*स्थिरचर वनस्पती।*
*परक्यांची पण सत्ता नलगे, नेताजींच्या भूवरती।।*

हिन्दुस्थानच्या इतिहासांतील तो वनवासाचा काळ होता. वनवासांच ‘‘शय्या भूमितलम् । दिशो पि वसनम।’’ अशा वृतीने चालणारे सेनापती बापट मानतात.

*‘‘आईवरी विपत्ती । आम्ही मुले कशाला ।*
*बंदीत मायभूमी । आम्ही खुले कशाला ।*
*रक्ताळले शरीर । भडका जिवांत झाला ।*
*आईस सोडावया । येणार कोण बोला ।।धृ।।’’*

नंग्या तलवारीवर हात ठेवून त्यांनी मातृभूमी स्वतंत्र करण्याची शपथ घेतली. त्यांना जीवनाचा मंत्र सापडला, सेनापती बापटांचे जीवन एक धगधगते यज्ञकुंड ठरले, ते म्हणतात.

*महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले । मराठ्या विना राष्ट्र गाडा न चाले ।।*
*खरा वीर वैरी पराधिनतेचा । महाराष्ट्र आधार या भारताचा ।।*

याच सेनापती बापटांबद्दल कवी कुंजविहारी म्हणतात

*मातृभूमीच्या उद्धारास्तव देह दिला करवती।*
*तयाला तुरुंग भिवविल किती ? ।।धृ।।*
*स्वातंत्र्य स्फूर्तीचे सिंचुनि अमृतकण ।*
*मृत मानवतेला आणि संजिवन।*
*तो सेनापती... कधि साहिल का बांधून ।।१।।*
*अशी शिबिरी, क्षण विश्रांतीस्तव जात सुखे*
*संपत्ती, तयाला तुरुंग भिवविल किती ?*

फैजपूर काँग्रेसनंतर १९३०-३२ चे सुमारास असहकाराच्या चळवळीने जोर धरला. रोज प्रभात फेऱ्या निघू लागल्या. या प्रभात फेऱ्यांतही काव्याची

निर्मिती झाली. पहाटेच्या प्रहरी दहा-पंधरा माणसांची रांग गल्ली बोळांतून फिरत देशभक्तिपर गीते म्हटली जात.

*अवधि न उरला, मांगल्याची, लग्नघटी भरली ।*
*वधूनो, लग्न घटी भरली ।*
*स्वराज्य देवी मळवट भरुनी*
*पाटावर वसली ।।धृ।।*
*वाजंत्र्यानो तुम्ही वाजवा तोफांचे चौघडे ।*
*लोकशाहीचे ताशे वडवा, जशी वीज कडकडे ।।*
*रणशिंग फुंकूनी देशबंधूना आमंत्रण धाडा ।*
*चला आणू या स्वातंत्र्याचा मिरवित वर-घोडा ।।धृ।।*
*वाटेमाजी उतरुनी दहीचा नारळ फोडावा ।*
*भ्याडपणाचा दहीभात मग उतरुनी टाकावा ।।*
*वाटेमाजी दिवाभितीची दक्षिणार्थ दाटी।*
*कुवेर धनही पडेल अपुरे स्वातंत्र्यासाठी ।।*

लोकजागृती प्रश्न हाच प्रभात फेऱ्याचा उद्देश असल्याने लोकांनाही साद घातली जायची. या प्रभात फेरीत स्त्रिया, पुरुष, मुले एकाच आवाजात गाणी गात गावांतून हिंडत, सकाळच्या शांत प्रसन उत्साहदायी वातावरणात ही गीते ऐकून देशभक्तीची ज्योत अंतःकरणात प्रज्वलित होत असे. ही स्फूर्ती गीते ऐकून काही स्थानिक कवींना प्रेरणा मिळत असे. ते कविता रचून म्हणत,

*नवहिंद राष्ट्र झेंड्या प्रणामा घे या ।*
*स्वातंत्र्याच्या वाऱ्यावरती फडफडणाऱ्या प्रणाम घे या ।।*

या लोक जागृतीतून लोकांमध्ये निर्भयपणा निर्माण झाला. लोक मुक्तपणाने गाऊ लागले.

''*नही रखनी, नही रखनी,*

*सरकार जालिम नही रखनी ।*
*कातिल सरकार नही रखनी ।*
*जुलमी सरकार नही रखनी ।।''*

भारतीय स्वातंत्र्याच्या रणसंग्रामांत ब्रिटीश सत्तेला ''छोडो भारत' चा अंतिम इशारा ८ ऑगस्ट १९४२ रोजी दिला. आणि अवघा भारत आंदोलनाच्या संघर्षात घोटून उठला. देशभक्तीच्या वारुने अनेक कवींना झपाटले. ग. दि. मा. हे त्यातलेच कवी. त्यांनी गर्जना केली.

*मायमाऊली भारत माते घे पहिला मुजरा ।*
*स्वातंत्र्याचा उमदा शाहीर आला दरबारा ।।*
*घडण कराया स्वातंत्र्याची स्वर्गीजे गेले ।*
*वीर हुतात्मे दरवारी तव मानाने बसले ।*

कवीश्रेष्ठ ग. दि. माडगुळकर यांनी या आंदोलन काळांत पोवाडे, गाणी, लावण्या, प्रातःस्मरणे कितीतरी स्फूर्ति कवने लिहिली. शाहिर शंकर निकमांनी ही गाणी गावोगावी जाऊन ती आपल्या खड्या आवाजात गाऊन लोकांना जाग आणली. साताऱ्याच्या प्रतिसरकारचे ग. दि. मा. प्रचारकच बनले.

*चिंता नका करू रे पोटाची।*
*कोठार भरली सरकारची ।।*
*खुशाल ती आपण लुटायची। जी जी जी।*
*फोडूनी तिजोऱ्या त्यांच्या।*
*फुका पैक्याच्या आपल्या ।*
*घामाने स्वातंत्र करु आपले सरकार।*
*शांतीसाठी हाती धरु हत्यार। आपला आपणा ।*
*करु कारभार। जी जी जी।*

*सत्यासाठी सुखे लुटाया सत्तेचा पैसा।।*
*शिवरायांनी घालून दिला धडाच हा ऐसा।*

सातारच्या क्रांतिकारकांनी रेल्वे खजिने लुटले लढ्यासाठी द्रव्य मिळविले. ग. दि. मा. म्हणाले,

*नाना पाटील नाही एकला।*
*त्यांच्या दिमतीला उभा ठाकला ।*
*मर्दाचा सारा सातारा प्रांत ।।*

ते पुढे म्हणतात

*याला प्रतिबंध जे करणार ।*
*दिवा नाही त्यांच्या वंशात उतरणार ।।*
*क्रांतीत पेटूनी उठे चिमुकला गाव ।*
*घातले तयाने साम्राज्यावर घाव।।*

बेचाळीसच्या हुतात्म्याबद्दल कवी ग. दि. मा. म्हणतात

*बेचाळीसच्या लढ्यांत मारुन अमरपदी गेले।*
*या ते तुम्ही वीर मर्दा हो दरबारी सांगले ।।*
*या दरबारी जागा तुमच्या खास राखलेल्या*
*व तुमच्या पायी पायघड्या ह्या प्राणांच्या केल्या।*
*वंदे मातरम, वंदे मातरम झाली ललकारी।*
*बेचाळीसचे विजयी योद्धे आले दरवारी।।*

वंदे मातरम गीताला आणि घोषणेला भारतीय जनमनांत अभिमानाचे स्थान आहे. या शब्दांनी इतिहास घडविला आहे. ग. दि. मा. च्या लेखी या शब्दांनी इतिहास घडविला आहे. ग. दि. मा. च्या लेखी या शब्दाला वेद मंत्राचीच गौरव प्रतिष्ठा आहे ते म्हणतात.

*वेद मंत्राहून आम्हा वंद्य वंदेमातरम् ।*
*माऊलीच्या मुक्ततेचा यज्ञ झाला भारती ।*
*त्यांत लाखो वीर देती जिवितांच्या आहुती।*
*आहुतींनी सिद्ध केला मंत्र वंदेमातरम*
*याच मंत्राने मृतांचे राष्ट्र सारे जागले*
*शस्त्रधारी निष्ठुरांशी शांतिवादी झुंजले*
*शस्त्रहिना एक शस्त्र। लाभे शस्त्र ''वंदे मातरम''।*
*निर्मिला हा मंत्र ज्यांनी आचरिला झुंजुनी।*
*ते हुतात्मे देव झाले स्वर्गलोकी जाऊनी,*
*गा तयांच्या आरतीचे गीत वंदे मातरम् ।।*

हुतात्म्यांच्या बलिदानानंतर पारतंत्र्याच्या १५० वर्षानंतर १५ ऑगस्ट उगवला, पारतंत्र्याचा अंधार संपला. भारतीयांचे स्वप्न साकार झाले. ग. दि. मा. हर्षोत्मादित प्रतिभेने ललकारी दिली.

*हिमालयावर झडली नौबत ।*
*स्वतंत्र झाला राजा भारत ।*
*इतिहासांच्या दिल्ली शहरी ।*
*अभिषेकाची होत तयारी ।*
*मयुर सिंहासनी हांसरी ।*
*चढली मूर्ती, डौलडौलत ।*
*हा तर राजा स्वतंत्र भारत ।।*
*चौदा भाषा गर्जत उठल्या ।*
*जयमृत्यूंजय जय हिमपर्वत ।*
*जय रणचंडीके जय जय भारत ।*
*जय भारत जयहिंद ।।*

मराठी कवितेला केशवसुतांपासून बंडाचे क्रांतीचे देणे लाभले आहे.

केशवसुतांचे स्वतःला शिष्य समजणारे कवी आणि शाहिर अमर शेख म्हणजे आग, रंग, धुंदी, बेहोशी यांची जिवंत बेरीज असे ते म्हणतात.

*बुडला सारा देश, बुडली जंगलेही अंधारात।*
*भडकूनि उठली जनता सत्तावन्नाच्याच बंडात।*
*आणि चमकली विजली लक्ष्मी धनांकरांत।*
*दशक बावरे वीज सुप्त जन–मन मंदिरात।*
*राष्ट्रभक्तिने प्रेरित होऊन कवि म्हणाला ।*
*जनसागर सीमेला भिडू द्या।*
*शिरकमळे अग्नीत पुरु द्या ।*
*ध्वज राष्ट्राच्या सीमेवरचा भिडू द्या रे गगनाला ।।*

गोवा सत्याग्रहाचे वेळी शाहिर म्हणाले
*एक भारतीय जोवर राहील*
*गुलामगिरीच्या बंधात ।।*
*तोवर कुठला घास सुखाचा ।*
*कोण असे आनंदात ।।*
*फिरंगी साम्राज्यांचे मिळवू*
*धुळीत उरले कोटकडे ।।*
*वेचुनि काढा मग पोर्तुगिज*
*मुळा सकट अनचलापुढे ।।*

*शाहिर पुढे सांगतात –*
*तोफा रणगाडे । इथेहि लढतील ।*

*मानव शत्रुंचे मुडदे पडतील ।*
*शस्त्रे घेऊ अस्त्रे ही जिंकू नि*
*दावू–मानव नाही गुलाम ।*

चीनच्या आक्रमणाच्या वेळी अमर शेखांनी काव्यांत आरोळी दिली
*बर्फ पेटला हिमालयावर ।*
*विझवायला चला चला ।*
*फक्त रक्त द्या, वृद्ध तरुण या ।*
*द्या रे साद हाकेला ।।धृ।।*

पुढे ते लिहितात
*हिन्द रक्षिण्या तुझी जयभवानी तलवार*
*दिल्लीश्वराची लाज राखण्या मराठ्यास दे निर्धार ।*
*विशाल भाल हिमगिरी ।*
*अभिमान आम्हाला भारतीयांना।*
*असे ताल स्वरांत सांगणारा हा कवि सांगतो*
*जन्म धरती वरती या धन्य आम्ही ते।*
*पूज पूज्य मायभूमि गाऊनि गीते.....*

या मंतरलेल्या गीतांनीच '''भारतांतील लक्षावधी लोकांना परकीय सत्तेच्या सशस्त्र फौजेविरुद्ध निशस्त्र हाताने पण निर्भय मनाने झुंजावयाची शक्ती दिली. प्रेरणा दिली. या मंतरलेल्या गीतांनीच स्वातंत्र्य लढ्याचे रणशिंग फुकले, या गीतांनीच भारत स्वातंत्र्याच्या प्रेरणेने खडबडून उठला. स्वातंत्र्याच्या त्या धगधगत्या यज्ञकुंडात ज्या देशभक्तांनी आपल्या प्राणांच्या आहुती दिल्या, वन्ही चेतवीत ठेवला. त्या क्रांतिकारकांच्या स्मृतीस वंदन म्हणून कवी कुसुमाग्रज क्रांतीचा जयजयकार करतात ते काव्यांतच

*गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार ।*
*अन् वज्रांचे छातीवरती घ्या झेलून प्रहार ।।*
*कशास आई भिजवीसी डोळे उजळ तुझे भाल।*
*रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल ।*
*सरणावरती आज आमुची पेटतात प्रेते।*
*उठतील त्या ज्वालांतून भावी क्रांतीचे नेते।*
*ते दंड तव पायामधले खळखळा तुटणार।*
*आई खळखळा तुटणार ।*
*गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार ।*

*तर कवी यशवंत म्हणतात*
*संमरी वीरप्रणी जे धैर्यगुरु संकटी*
*जन्मले या भारती*
*राष्ट्र चक्रो धरणी कर्णापरी ज्यांना*
*स्मृती गाऊ त्यांना आरती*

*देश ज्यांचा देव, त्याचे दास्यमुक्ती ध्येय हो।*
शेवटी कुसुमाग्रजाच्या मंतरलेल्या गीतांतील शब्दांत ही श्रद्धांजली

*यज्ञी ज्यांनी देऊनि निज शिर*
*घडिले मानवतेचे मंदिर ।*
*परी जयांच्या दहन भूमिवर*
*नाहि चिरा नाही पणती ।*
*तेथे कर माझे जुळती ।।*

**संकलनः द. कृ. वैरागी, पेण.**

**त्रैमासिक कर्नाळा क्रांतिपुष्प अकरावे मधील प्रकाशित लेख साभार.**

## *राष्ट्रभक्ती कवी संमेलन, राष्ट्रभक्तांना मानवंदना!*

# *मानवंदना*

*राष्ट्रभक्त ही जमली जनता*
*देशभक्तीच्या रचिती कविता*
*राष्ट्रासाठी झीजले कणकण*
*त्यांची गाती जिवन गाथा...१*

*राष्ट्रभक्तीचे कवी संमेलन*
*मातृभूमीसी करण्या वंदन*
*राष्ट्रवाद हा विषय जयांचा*
*मनामनांतूनी रुजवायाचा...२*

*छत्रपतींचे आम्ही पाईक*
*राष्ट्रभक्तीची ध्वजा उभारू*
*मारू अथवा मारीत जिंकू*
*राष्ट्ररक्षिण्या जिवन अर्पू...३*

*जे जे पडले धारातिर्थी*
*त्यांची गाऊ रोज आरती*
*काव्यरसाने करूनी शिंपण*
*शूर विरांना करू या वंदन...४*

*रचनाकार: चंद्रकांत शहासने*
*देशभक्तकोशकार, पुणे*

# येणार कोण बोला?

*अनेकविध संकटांना मात देऊन सार्वजनिक जीवनमान सुदृढ, निकोप, निरोगी आणि निर्भय करण्याचा संकल्प.*

*घामेजले शरीर भडका दिशांत झाला*
*आईस सोडवाया येणार कोण बोला ?*

*दूषित भूमी झाली, वारा विषारी झाला*
*निसर्ग रक्षणासी, येणार कोण बोला ?*
*तोडुनी वृक्षराई, डोंगर उजाड केला*
*वनराई रक्षण्यासी,येणार कोण बोला ?*

*संस्कारहीनतेसी, येथे मिळे प्रतिष्ठा*
*ढोंगीच संत बनती, संता मिळे उपेक्षा*
*ढोंगीच या मुठीला देण्यास तीव्रधक्का*
*येणार कोण बोला, येणार कोण बोला*

*तोंडात एक भाषा, पोटात भिन्न भाव*
*जनतेस नागविती, ऐसे अभद्र भाव*
*ढोंगीजनांस आता, देण्यास तीव्रधक्का*
*येणार कोण बोला, येणार कोण बोला*

*रचनाकार :*
*चंद्रकांत शहासने (देशभक्तकोशकार)*
*मोबाईल : ९८८१३७३५८५*